# प्रेसनोट

## प्रादेशिक परिवहन विभाग नागपूर शहर येथील मोटार वाहन निरीक्षक यांचेविरुध्द नागपूर लाचलचुपत प्रतिबंधक विभागाने केली यशस्वी सापळा कारवाई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर येथे तक्रारदार यांनी समक्ष येवून तक्रार नोंद केली की, तक्रारदार हे व्यवसायाने वाहन चालक असून त्यांचे मालकाचे ट्रेलर चालवितात. तक्रारदार चालवित असलेले ट्रेलर कान्द्री येथील आरटीओ चेकपोस्ट (सिमा तपासणी नाका) येथून वाहन पास करण्याकरिता तेथील अधिकारी त्यांचे अखत्यारित खाजगी एजंट हे १०००/- रू ते १५००/-रू. लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दिली.

तक्रारदार यांचे तक्रारीवरून आज दिनांक ११/०३/२०२६ रोजी सापळा अधिकारी यांनी कारवाई केली असता तक्रारदार हे त्यांचे मालकाचे ट्रेलर घेवून नागपूर ते देवलापार येथे जातांना कांद्री येथील आरटीओ सिमा तपासणी नाका येथून ट्रेलर पास करण्याकरिता श्री अभिजित मधुकर टाले, मोटार वाहन निरीक्षक, नेमणुक प्रादेशिक परिवहन विभाग कार्यालय नागपूर शहर यांचे अखत्यारितील खाजगी एजंट नामे श्री सुशिल विनोद रामटेककर (खाजगी) यांनी तक्रारदार चालवित असलेले ट्रेलर चेकपोस्ट मधुन पास करण्याकरिता १०००/-रू लाचेची मागणी करून पंचासमक्ष स्विकारली. चेकपोस्ट येथील कार्यालयाची झडती घेतली असता तेथे ४,३१,२९०/- रू. नगदी  मिळून आलेले आहे. सदर दोन्ही आरोपीतांना कांन्द्री चेकपोस्ट येथून ताब्यात घेण्यात आले असून पोलीस स्टेशन रामटेक, नागपूर ग्रामिण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८ ) अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि, नागपूर, श्री विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राजकिरण येवले, आणि सापळा पथक पोलीस निरीक्षक जिर्तेन्द्र वैरागडे, पोहवा भरत ठाकुर, मपोशि दिपाली भगत, पोशि होमेश्वर वाईलकर  यांनी केलेली आहे.

नागपूर जिल्हयातील सर्व नागरिकांना आव्हान करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (ऐजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशिर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काल लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथे संपर्क साधावा.

### लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा

**१.** पोलीस अधीक्षक कार्यालय दुरध्वणी क्र. ०७१२-२५६१५२०,
**२.** टोल फ्री क्रमांक : १०६४, व्हॉट्स ॲप क्र. ९०६७६७१०६४
**३.** डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१८५५६६
**४.** श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ७०३८४३६४४१
**५.** श्री विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१४२५६९
**६.** श्री राजीव कर्मलवार, वाचक पोलीस निरीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९०२१४५२७६०